बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.NO./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२८२ ■ बुधवार १५ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

उत्कृष्ठ क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

## एसटी महामंडळाच्या जागा १८ वर्षांसाठी भाडेपट्ट्याने देण्यास मंत्रिमंडळाची मान्यता



**मुंबई, दि. १४ : राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायतींना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम व स्वावलंबी करण्यासाठी त्यांच्या मालकीच्या मालमत्तांचा खासगीकरणातून विकासाची परवानगी देणाऱ्या मुद्रीकरण धोरणास आज मंत्रीमंडळाने मान्यता दिली. एस.टी. महामंडळाकडील अतिरिक्त जागा विकासासाठी भाडेपट्ट्याने देण्यासही मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. विविध योजनांमुळे तिजोरीवर येणाऱ्या भारामुळे सरकार बेजार असून विकासासाठी आता खासगीकरणाचा आधार घेण्याची भूमिका सरकारने घेतली आहे. नवीन धोरणामुळे जागांची लीज होणार आहे. पण मालकी सदैव एसटी महामंडळाचीच असणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.**

महानगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायतींना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम व स्वावलंबी करण्यासाठी त्यांच्या मालकीच्या मालमत्तांचा खाजगीकरणातून विकासाची परवानगी देणाऱ्या धोरणास आज राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या जागा, इमारती, व्यावसायिक संकुले, बाजारपेठा, सार्वजनिक सुविधा, तसेच इतर स्थावर मालमत्तांचा नियोजनबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने विकास करून त्यातून उत्पन्न वाढविणे, हा या धोरणाचा प्रमुख उद्देश आहे. या धोरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतःचे शाश्वत आर्थिक स्रोत उपलब्ध होतील. त्यामुळे पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, शिक्षण, वाहतूक आणि इतर नागरी सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधी उभारणे शक्य होणार आहे. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानावरील अवलंबित्व कमी होऊन स्थानिक संस्थांची आर्थिक स्वायत्तता अधिक बळकट होईल, असे सरकारचे म्हणणे आहे.

मालमत्तांच्या विकासासाठी सार्वजनिक, खासगी भागीदारी तसेच अन्य योग्य विकास मॉडेलचा अवलंब करता येणार असून सर्व प्रक्रिया पारदर्शक, स्पर्धात्मक आणि नागरिकहिताला प्राधान्य देणाऱ्या पद्धतीने राबविण्यात येणार आहेत. राज्यात सध्या २९ महानगरपालिका, १५ अ वर्ग (पान ४ वर)

## सोनम वांगचुक यांचे आठ किलो वजन घटले

नवी दिल्ली, दि. १४ : नीट पेपरफुटी आणि सीबीएसईमधील गोंधळाप्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी लडाखमधील सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक आणि सीजेपीचे अध्यक्ष अभिजीत दिपके गेल्या उपोषण करीत आहेत. राजधानीतील जंतरमंतरवर सुरू असलेल्या या उपोषणाला थ्री-इडियट्स या सुपरहिट चित्रपटातील चतुर रामलिंगम म्हणजेच अभिनेता ओमी वैद्य याने जाहीर पाठिंबा दिला आहे.

आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या कॉक्रोच जनता पार्टी या संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, उपोषणादरम्यान वांगचुक यांचे वजन तब्बल आठ किलोने कमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. याच पार्श्वभूमीवर ओमी वैद्यने सोशल मीडियावर एक व्हीडीओ शेअर करत देशवासीयांना या संवेदनशील विषयावर (पान ४ वर)

## वाढवण बंदराजवळ आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारणार- ना.जयकुमार रावल

**मुंबई, दि. १४ - पालघर जिल्ह्याच्या डहाणू तालुक्यातील दापचरी येथे ५५८.४३ हेक्टर (१,३९५ एकर) क्षेत्रावर आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारण्यात येणार असून, हा प्रकल्प महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेशी थेट जोडणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम ठरेल, असा विश्वास पणन मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.**



पणन मंत्री रावल यांनी मंत्रालयात पत्रकारांशी संवाद साधताना दापचरी येथे उभारण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कृषी बाजाराबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते.

मंत्री रावल म्हणाले, वाढवण बंदरापासून अवघ्या ४० किलोमीटर अंतरावर उभारण्यात येणारा हा प्रकल्प फ्रान्समधील रुंगीस मार्केट, नेदरलँड्समधील रॉयल फ्लोरा हॉलंड तसेच रॉटरडॅम बंदर परिसरातील आधुनिक कृषी लॉजिस्टिक व्यवस्थेच्या धर्तीवर विकसित करण्यात येणार आहे. देशांतर्गत तसेच निर्यात बाजारपेठांच्या गरजा पूर्ण करणारे जागतिक दर्जाचे कृषी व्यापार केंद्र म्हणून त्याची उभारणी केली जाईल.

**त्रिस्तरीय विपणन व्यवस्था**

राज्यात आंतरराष्ट्रीय बाजार, राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार आणि कृषी उत्पन्न बाजार समिती अशी त्रिस्तरीय विपणन व्यवस्था विकसित करण्याचे नियोजन असून, त्यातून कृषी मालाच्या मूल्यसाखळीला बळकटी मिळणार आहे. निर्यात बाजार सुविधांचे एकत्रीकरण, काढणीनंतरचे मूल्यवर्धन, संगणकीकृत व पारदर्शक व्यवहार आणि आधुनिक बाजार पायाभूत सुविधा यावर विशेष भर दिला जाणार असल्याचे मंत्री रावल यांनी सांगितले.

**केंद्रात सहा महत्त्वाच्या सुविधा**

दापचरी येथील केंद्रामध्ये घाऊक व्यापार, आयात-निर्यात सुविधा, शीतसाखळी व्यवस्था, ग्रेडिंग व पॅकेजिंग, मल्टिमोडल लॉजिस्टिक व्यवस्था तसेच ग्रीटेक व एक्स्चेंज सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. याशिवाय वेअरहाऊसिंग, कोल्ड स्टोरेज, रिपनिंग चेंबर्स, (पान ४ वर)



कंदील येथील शिवाजी मार्केट मनपाच्या अतिक्रमण विभागा तर्फे पाडण्यात आल्या नंतर त्या ठिकाणी लोखंड सळया व लाकूड घेण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली. यावेळी लोखंड पत्रे, विटा, नेण्यासाठी लोक आपल्या जिवाची पर्वा न करता भंगार नेतांना दिसून आले. **(छाया - बॉम्बे फोटो)**

## महापालिकेची महत्वाकांक्षी कारवाई धुळ्यातील शंकर मार्केट जमीनदोस्त

धुळे दि.१४ - शहराच्या मध्यवर्ती भागाचा कायापालट करण्यासाठी आणि पाचकंदील मार्केटचा पुनर्विकास करण्यासाठी महानगरपालिकेने आज धडक कारवाई केली. अनेक वर्षांपासून रखडलेला हा मार्ग अखेर मोकळा झाला. शहरातील सुमारे शंभर वर्षे जुने असलेले शंकर मार्केट आणि शिवाजी मार्केट हे दोन जुने कापड मार्केट महापालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन पथकाने उशिरापर्यंत कारवाई करत पूर्णपणे जमीनदोस्त केले आहे. याबाबत व्यवसायिक आणि महापालिका प्रशासनाचे परस्परांना छेद देणारे दावे करण्यात येत आहेत. दरम्यान, महापालिका आयुक्त नितीन कापडणीस आणि अभियंता चंद्रकांत ओगले यांनी या ठिकाणी भेट देऊन पहाणी केली. (पान ४ वर)

## सुनेत्रा पवार यांचे अध्यक्षपद धोक्यात? खा. सुनील तटकरेंचे महत्त्वाचे विधान



मुंबई, दि. १४ - राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षात सध्या मोठे वादळ उठले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदालाच जाहीर आव्हान देण्यात आले आहे. सुनेत्रा पवार यांची अध्यक्ष म्हणून केलेली निवड ही अवैध असल्याचा दावा पक्षातील नेते सच्चिदानंद सिंह यांनी केला आहे. तशी नोटीसच त्यांनी सुनेत्रा पवार, पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांना पाठवली आहे. दरम्यान, या नोटिशीनंतर राष्ट्रवादी पक्षात नेमके काय होणार? असे विचारले जात आहे. सच्चिदानंद सिंह यांनी ही नोटीस स्वतः पाठवलेली आहे की, त्यामागे अन्य एखादा चेहरा आहे, असे विचारले जात आहे. या सर्व घडामोडी घडत असताना आता याच प्रकरणावर राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते तथा खासदार सुनील तटकरे यांनी सविस्तर भाष्य केलं आहे. नोटिशीबाबत आम्ही कायदेशीर सल्ला घेऊ, असे ते म्हणाले आहेत. आलेल्या नोटिशीत तथ्य नाही. राष्ट्रीय अध्यक्षांसाठी बोलवण्यात आलेली तेव्हाची बैठक ही नियमानुसारच होती. आम्ही तरीही(पान ४ वर)

## अक्कलपाडा योजनेत दुरूस्ती धुळ्यातील क्षेत्रात पाणी नाही

धुळे, दि. १४ : शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या अक्कलपाडा पाणी पुरवठा योजनेच्या जलवाहिनीवर ठिकठिकाणी कामे करण्यात येत असल्याने उद्या ( दि. १५) या योजनेवर आधारलेल्या क्षेत्रात पाणी पुरवठा होणार नाही, असे महापालिकेच्या पाणी पुरवठा योजनेच्या कनिष्ठ अभियंत्यांनी कळविले आहे.

महापालिकेच्या कनिष्ठ अभियंत्यांनी पत्र क्र. ४९४, २०२६ नुसार पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे की, अक्कलपाडा योजनेच्या कामासाठी १५ जुलैस ठिकठिकाणी कामे करण्यात येत आहेत. त्यासाठी या योजनेवर आधारीत असलेल्या क्षेत्रात पाणी पुरवठा होणार नाही.

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या सामूहिक हत्येचा प्रयत्न; दिपक केदारांचा आरोप

शहादा, दि.१४(का.प्र.) - येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मुलांच्या वसतिगृहात ३० मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अन्नातून झालेल्या विषबाधेप्रकरणी राज्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. हा केवळ निष्काळजीपणा नसून मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे सामूहिक हत्याकांड घडवून आणण्याचा एक भयानक आणि सुनियोजित प्रयत्न होता, असा खळबळजनक आरोप ऑल इंडिया पँथर सेनाचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपकभाई केदार यांनी केला आहे.

सोमवार, दिनांक १३ रोजी रात्री उशिरा दीपकभाई केदार यांनी तातडीने शहादा येथील रुग्णालय आणि संबंधित निवासी वसतिगृहाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. रुग्णालयात उपचार घेत असलेल्या निष्पाप विद्यार्थ्यांची आस्थेने विचारपूस केल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना अत्यंत संतप्त भावना व्यक्त केल्या आणि थेट सरकारला धारेवर धरले.माध्यमांशी बोलताना दीपकभाई केदार यांनी या घटनेचे गांभीर्य अधोरेखित करत थेट प्रशासकीय आणि राजकीय व्यवस्थेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे (पान २ वर)

## परताव्याचे आमीष ठेकेदाराची फसवणूक

धुळे, दि. १४ - शेअर्स मार्केटमध्ये गुंतवणूक करून मोठ्या प्रमाणावर परतावा देण्याचे आमिष दाखवून एका ठेकेदाराची ६ लाख ८० हजार रुपयांत फसवणूक झाली. याप्रकरणी येथील सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात व्हॉट्सप आणि टेलिग्राम खातेधारकांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

शासकीय ठेकेदार राहुल पंचम मोरे (वय ३२, रा. प्लॉट नं. ४, पांडव, अभय नगर, शनी मंदिर जवळ, मालेगाव रोड, धुळे) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार २५ ऑक्टोबर २०२५ पासून २ मार्च २०२६ दरम्यान अज्ञात आरोपींनी सोशल मीडिया वरून त्यांच्याशी संपर्क साधला. आरोपीने इंटरनॅशनल कंपनीमध्ये शेअर्स मार्केट इन्व्हेस्टमेंट स्कीम असल्याचे (पान २ वर)

## शहरातील बाजारपेठेत वीजेचा खेळखंडोबा दिवसभर व्यावसायिक त्रस्त, कार्यालय बंद

**धुळे, दि. १४ - शहर आणि परिसरात आज दिवसभर वीजेचा लंपडाव सुरू होता. त्यामुळे शहरातील विविध क्षेत्रातील व्यवसायिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. महापालिकेचा कारभार होत असलेल्या स्वस्तिक चौक आणि परिसरात सकाळी अकरापासून रात्री आठ पर्यंत वीजेचा लपंडाव सुरू होता. दिवसभर वीज पुरवठा खंडीत होत असल्याने व्यवसायिकांच्या पर्यायी व्यवस्थेत असलेल्या इन्व्हर्टर मधील बॅटरीज चार्ज होऊ शकल्या नाहीत. अनेक व्यवसायिकांनी वीज कंपनीच्या**





**लालबाग कार्यालयात अनेक नागरिक तक्रार घेऊन पोहचले. पण, या ठिकाणी कार्यालय बंद असल्याने नागरिकांना वीज कंपनीच्या मानमानी कारभाराचा त्रास सहन करावा लागला. काही व्यवसायिकांनी वरिष्ठांच्या कार्यालयात संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण, तेथे संपर्क झाला नाही. परिणामी, मनस्ताप सहन करण्यापलीकडे नागरिक आणि व्यवसायिक काहीच करू शकले नाहीत.**

शहरात गेल्या काही दिवसांपासून वादळी वाऱ्यासह होत असलेल्या पावसाने विश्रांती घेतली. या काळात वीज कंपनीने वीज पुरवठ्यात येणाऱ्या अडचणी सोडविणे अपेक्षित होते. तसेच पावसाळ्यास (पान २ वर)

## अज्ञात वाहनाची धडक अजनाळेजवळ दोन ठार

धुळे, दि.१४ - अजनाळे (ता. धुळे) शिवारात अज्ञात वाहनाने ट्रकला मागून जोरदार धडक दिल्याने दोन जण जागीच ठार झाले. चार जण गंभीर जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

योगेश तुळशिराम अहिरे (रा. धमनार, ता. साक्री) नातेवाईक मालवाहू गाडीने (एमएच१८/बीझेड१४५२) रविवारी (ता.१२) जात होते. अजनाळे शिवारात पाठीमागून येणाऱ्या एका अज्ञात वाहनाने जोराची धडक दिली. धडकेनंतर मालवाहू गाडी रस्त्यावरच उलटली. गाडीतील भाईदास दशरथ सोनवणे (वय ४६), वकील बापू सोनवणे (वय ५०, दोन्ही रा. धमनार) (पान ४ वर)

## ह.बाबा पीर सरकार उर्स निमित्त रक्तदान; चिंतन पटेलांनी केला गौरव



**शिरपूर, दि.१४(प्रतिनिधी)- हजरत बाबा पीर सरकार यांच्या पवित्र उर्स-ए-मुबारक निमित्त मुस्लिम समाजाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत मौलाना आझाद चौक येथील हॉल मध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यात दात्यांनी रक्तदान केले. नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या हस्ते रक्तदात्यांचा पाण्याचा जार भेट देऊन गौरव करण्यात आला.**

जाकीर अली (जे. के. दादा) आणि नगरसेवक इरफान मिर्झा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमाला अनेक नगरसेवक, नगरसेविका, विविध संस्थांचे पदाधिकारी, शहरातील युवक, नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सकाळी १० वाजता सुरू झालेल्या रक्तदान शिबिरात दिवसभर मोठ्या संख्येने युवकांनी रक्तदान करून मानवतेप्रती असलेली आपली सामाजिक जबाबदारी पार पाडली. रक्तदान हेच जीवनदान हा संदेश देत अनेक प्रथमच रक्तदान करणाऱ्या युवकांनीही उत्साहाने सहभाग घेतला.

शिबिरात संकलित झालेले सर्व रक्त मुकेशभाई ब्लड बँकेकडे सुपूर्द करण्यात आले असून, त्याचा उपयोग आपत्कालीन परिस्थितीत तसेच गरजू रुग्णांच्या उपचारासाठी होणार आहे.

या प्रसंगी नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपनगराध्यक्ष संगीताताई देवरे यांनी शिबिराला भेट देऊन रक्तदात्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या हस्ते प्रत्येक रक्तदात्याला रक्तदान प्रमाणपत्र आणि पाण्याचा जार भेट देऊन गौरविण्यात आले. या सन्मानामुळे युवकांचा उत्साह द्विगुणित झाला असून, समाजसेवेच्या कार्यात अधिकाधिक (पान ४ वर)

## अन्न, औषध प्रशासनाकडून धुळयात दोन अस्थापना सीलबंद, नमुने घेतले

धुळे दि. १४ - शहरात नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने अन्न व औषध प्रशासनाने आज धडक तपासणी मोहीम राबवत विविध आस्थापनांवर कारवाई केली. या कारवाईत दोन स्वीट्स आस्थापना तात्काळ बंद करण्यात आल्या. तर दोन डेअरीमधून दुधाचे चार नमुने तपासणीसाठी घेण्यात आले.

अन्न सुरक्षा व मानके कायदा २०२६ अंतर्गत स्टेशन रोड आणि वाडीभोकर रोड येथे तपासणी करण्यात आली. या दोन्ही डेअरींमधून म्हशीचे दूध व गायीचे दूध असे एकूण चार नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. तपासणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संबंधित आस्थापनांना नोटीस बजावण्यात येणार असल्याची (पान ४ वर)

## आयशर अपघात चालक ठार

नंदुरबार (प्रतिनिधी) : नवापूर तालुक्यातील चरणमाळ घाटात आयशर वाहनाचा भीषण अपघात होऊन चालकाचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ जुलै २०२६ रोजी सकाळी सुमारे ०९:४२ वाजता ही घटना घडली. मृत चालकाचे नाव हेमंत शांतिलाल पाटील (रा. खोरदड, ता. जि. धुळे, सध्या पिंपळनेर, ता. साक्री, जि. धुळे) असे आहे. हेमंत पाटील हे एम एच १८ बी जी ६८०९ क्रमांकाचे आयशर वाहन नवापूर तालुक्यातील चरणमाळ घाटातून चालवत असताना रस्त्यावरील परिस्थितीकडे दुर्लक्ष झाल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर आयशर वाहन पलटी होऊन झालेल्या अपघातात चालकाचा मृत्यू झाला. अपघातात वाहनाचेही नुकसान झाले आहे. या घटनेची नोंद संबंधित पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पोलिस ठाणे प्रभारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पोना/५०० दिनेश प्रल्हाद शिरसाठ करीत आहेत.



## नवापूरला विकासाचा शब्द पाळला चौपन्न लाखांच्या रस्त्याचे भूमिपूजन

नवापूर, दि.१४(प्रतिनिधी)- नवापूर शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकत जुनी पोलीस लाईन ते पंचायत समिती या अत्यंत वर्दळीच्या मार्गाच्या कॉंक्रीटीकरणाच्या कामाचे भूमिपूजन आज उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. तब्बल ५४ लाख रुपयांच्या निधीतून हा दर्जेदार कॉंक्रीट रस्ता उभारला जाणार असून, या कामामुळे नागरिकांची अनेक वर्षांपासूनची गैरसोय दूर होणार आहे. शहरातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी दिलेल्या वचनपूर्तीचा हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या विकासकामाचे भूमिपूजन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजित पवार गट)चे ज्येष्ठ नेते भरतभाऊ गावित यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष जयवंत जाधव, उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे,बांधकाम सभापती भालचंद्र गावीत, पाणी पुरवठा सभापती शरद (पान ४ वर)

## हस्ती ग्रुपचे कांतीलाल जैन, शांतीलाल जैन यांना धुळ्यात सॅटर्डे क्लबचा मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार

धुळे दि. १४ - मराठी तरुणांमध्ये प्रचंड क्षमता असून त्यांनी आत्मविश्वासाने उद्योजकतेकडे वळावे, असे आवाहन धुळ्यातील उद्योजक आणि ओमश्री ॲग्रोचे संचालक महेंद्र उर्फ कैलास अग्रवाल यांनी आज येथे केले. प्रसिध्द सॅटर्डे क्लबच्या धुळे विभागीय ग्लोबल ट्रस्ट तर्फे उद्योग क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार हस्ती ग्रुप दोंडाईचा येथील कांतीलाल जैन आणि शांतीलालजी जैन तसेच महिला उद्योजिका पुरस्कार कविता संतोष बिरारी यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. शहरातील गल्ली क्रमांक सहा मधील एका हॉटेलच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात या पुरस्कारांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण झाले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

मराठी तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता व्यवसायात पाऊल टाकावे आणि यशस्वी व्हावे, या उद्देशाने धुळ्यात सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टच्या धुळे विभागातर्फे संस्थेचे संस्थापक स्वर्गीय माधवराव भिडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त मराठी उद्योजकता सन्मान सोहळा उत्साहात पार पडला धुळ्यातील पारोळा रोडवरील हॉटेल मनभावन येथे आयोजित या कार्यक्रमाला शहरातील नामवंत उद्योजक, व्यावसायिक आणि नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते म्हणून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष आणि ओमश्री ॲग्रो ग्रुपचे सर्वेसर्वा महेंद्र (कैलासशेठ) अग्रवाल उपस्थित होते. त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आपल्या उद्योजकीय प्रवासातील विविध पैलू उलगडून दाखवले. व्यवसायातील आव्हानांना तोंड देत यशाची शिखरे कशी गाठायची, याबद्दल त्यांनी तरुण (पान ४ वर)


९ वे पुण्यस्मरण



स्वर्गिय अतुल नंदकिशोर बांगड
आपणास स्मृतिप्रित्यर्थ भावपूर्ण श्रद्धांजली, सुमनांजली
शोकाकुल,
अनिल, नितीन (भाऊ)
सौ.सरिता अनिल बांगड (वहिनी) सौ.संध्या नितीन बांगड (वहिनी)
श्रीमती अनिता अतुल बांगड (पत्नी)
प्रणीत, सौ.राधिका प्रणीत बांगड, अर्पीता, प्रतिक, अनुजा, कृष्णा, प्रियंका
जिगनेश शहा, ललीतकुमार मंत्री, कवीश मंत्री, ध्रुवी शहा, पुर्वी (नात)
फर्म : बांगड कुलर्स ॲण्ड फर्निचर्स, मालेगावरोड, धुळे

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,31,900 रु.+3% GST
सोने- 24 K -1,44,000 रु.+3% GST
चांदी- 2,28,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

उठावणा



बड़े दुख के साथ आपको सूचित किया जाता है कि
स्व.मुरलीधर सागरमलजी अग्रवाल इनके बडे दामाद तथा
अशोक, विनोद, गिरीश इनके जिजाजी अकोला निवासी
श्रीमान पुरुषोत्तमजी श्रावगी
इनका दुःखद निधन हो गया है।
ईश्वर इच्छा। उनका उठावणा
बुधवार दि.१५/०७/२०२६ को
समय दोपहर ४ बजे
स्थान- अग्रवाल विश्राम भवन,
नदी किनारे, धुलिया यहापर है.।
-: शोकाकुल :-
राधेश्याम, पुरुषोत्तम, श्रीकिशन, ताराचंद, महावीर,
ओमप्रकाश, अशोक, विनोद, शरद, गिरीश
एवं समस्त मित्तल परिवार
फर्म- मे मुरलीधर सागरमल अग्रवाल,धुलीया

# आपला महाराष्ट्र

## आषाढस्य प्रथम दिवसे,महाकवी कालिदास दिन

आज आषाढ शुद्ध प्रतिपदा म्हणजेच आषाढ चा पहिला दिवस आहे. आजचा दिवस महाकवी किंवा कवी कुलगुरू कालिदास यांचा स्मृती दिवस म्हणून साजरा केला जातो. मेघदूत हे त्यांचे महान संस्कृत काव्य होय या काव्याच्या एका श्लोकात आषाढस्य प्रथम दिवसे असा उल्लेख आहे. हे महाकाव्य पतकीच्या विरहामुळे व्याकुळ झालेल्या एका यक्क्षा द्वारा मेघा सोबत त्याच्या पतकीला एक संदेश पाठवतो. त्या कल्पनेवर आधारित हे महाकाव्य आहे. या महाकाव्याने मराठी आणि हिंदी तील कवी आणि लेखकांना अक्षरशा भुरळ पाडलेली आहे, त्यांना प्रेरणा दिलेली आहे. इसवी सनाच्या पहिल्या दशकाच्या पूर्वार्धात या काव्याची निर्मिती झाल्याचा इतिहास आहे. अनेक भाषांमध्ये त्याचा अनुवाद झालेला आपल्याला दिसेल. कृष्णशास्त्री चिपळूणकर, नानासाहेब गोरे, बा.भ.बोरकर, कुसुमाग्रज, आदी अनेक दिग्गजांनी या महाकाव्यातील श्लोकांचा अनुवाद केलेला आहे.बा.भ.बोरकर यांनी केलेल्या अनुवादानुसार आषाढाच्या पहिल्या दिवशी बघतो शिखरी मेघ वाकला, टक्कर देण्या तट भिंतीवर क्रीडा तूर गज जणू ठाकला. अशाप्रकारे एकच कल्पना वेगवेगळ्या शैलीत कवी आणि लेखकांनी साकार केलेली आहे. कालिदास हे संस्कृत भाषेचे सर्वोच्च कवी आणि नाटककार होते गुप्त काळात जन्मलेले कालिदास सम्राट विक्रमादित्य यांच्या नवरतकांपैकी एक होते. त्यांच्या मेंघदूत आणि अभिज्ञान शाकुंतलम या ग्रंथातून निसर्गाचे चित्र आढळते. ते ज्या प्रकारे त्यांनी केलेले आहे त्यामुळे त्यांना भारतातील शेक्सपियर देखील म्हटले गेलेले आहे.

विक्रमादित्यांची राजधानी उज्जैन नगरी होती. त्यामुळे कालिदासांना मध्य प्रदेशाचा अनुभव होता. यक्षाचा संदेश घेऊन जो मेघ दूत बनून त्याच्या पतकीकडे निघाला होता त्या मेघाचा प्रवास मध्य प्रदेशातून झालेला आहे. त्याचा शेवट श्रीनगरला काश्मीर मध्ये झालेला आहे. सुरुवात रामटेकहून झालेली आहे. म्हणूनच कालिदासाचे स्मारक रामटेकला आहे आणि तिथेच महाराष्ट्र सरकारने महाकवी कालिदास संस्कृत विद्यापीठाची स्थापना केलेली आहे. कवी कुलगुरू कालिदास यांनी मेघदूतची रचना याच रामटेकला केलेली आहे. येथूनच यक्षाचा मेघदूत त्याच्या पतकीकडे जम्मू-काश्मीरला निघाला होता. तिथपर्यंतच्या भूप्रदेशाची संपूर्ण माहिती या महाकाव्यात मिळते. विश्वकोशात अशी कथा सापडते की एका यक्षाला कुबेराने कर्तव्यात केलेल्या चुकीमुळे शाप दिला आणि एका वर्षाच्या हद्दपारीची शिक्षा दिली. त्याने रामगिरी अर्थात रामटेकला येऊन या काळातील आठ महिने विरहात काढले. आषाढाच्या पहिल्या दिवशी त्याला पावसाचा ढग दिसला आणि त्याद्वारे आपल्या पतकीला संदेश पाठवण्याची कल्पना त्याला सुचली. या कल्पनेतून त्याने मेघाला जी विनंती केली त्याचे वर्णन आहे, त्या मेघाचा प्रवास मार्ग कसा राहील याची वर्णने आहेत, तिच्या घराच्या खाणाखुणा आणि तिचे वर्णन आणि तिला दिलेला धीर धरण्याचा संदेश अशी या काव्यातील मांडणी आहे. समकालीन काहींना ही कल्पना भ्रमक वाटली आणि अतिरंजीत वाटली. कारण कुठलाही मेघ अशा प्रकारचा संदेश देऊ शकत नाही कारण तो अचेतन आहे. मात्र या वर्णनात जी ठिकाणी आहेत त्याबद्दल आश्चर्य मिश्रित सौंदर्य प्रधान अनुभूती येते. यक्षाने ढगाला सांगितलेला मार्ग, तर मार्गातील डोंगर, त्याची नावे, नद्या, त्यांची नावे, जंगले, बागा, उज्जैनीसारख्या नगराचे वर्णन, इतर सर्व ठिकाणांचे वर्णन, श्रीनगरचे अप्रतिम सौंदर्य वर्णन करतानाच ज्या ठिकाणी कालिदासांचे वास्तव्य होते त्या उज्जैनी नगरीचे भरपूर वर्णन मेघदुतात आहे. यक्ष ज्या घरी राहतो त्या घराचे तपशीलवार वर्णन कवीने केलेले आहे. शिवाय यक्षाची पतकी हिचे वर्णन रसिकांना भावणारे आहे. कालिदासांची मेघदूत ही अभिजात भारतीय साहित्यकृती असून त्यात प्रेम आणि निसर्गावरील अनुभूती रसिकांना मिळते.

परिस्थितीमुळे पतकीपासून विभक्त झालेल्या यक्षाला जो विरह सहन करावा लागतो तो अत्यंत प्रेमाची साक्ष देणारा आहे. म्हणूनच रामगिरी सारख्या डोंगरावर शिक्षा भोगत असताना त्याला दिसलेल्या मेघाला दूत बनवावेसे वाटले. आणि मग त्याच्याशी तो बोलतो, त्याच्या मार्गाचे वर्णन करतो, त्या वर्णनात जी ठिकाणी आहेत ती कालिदासांनी बघितलेली दिसतात. उज्जैनी तर त्यांचे रहिवास ठिकाणच होते. त्यामुळे त्या नगरीचे वर्णन मेघदूतात विस्ताराने येणे स्वाभाविक आहे. गंमत म्हणजे ढग पूर्व विदर्भाच्या नागपूर जिल्ह्यातील रामगिरी या डोंगरावरून हिमालयाकडे जातात ते मध्य प्रदेश मार्गे तिकडे जातात, तेथून काश्मीर मध्ये त्यांचा प्रवास संपतो याचा अर्थ निसर्गाच्या पावसाचे जे चक्र आहे ते कालिदासांनी अभ्यासलेले असून यक्षाच्या रूपाने त्यांनी ते शब्दबद्ध केलेले आहे. त्यातील रस्त्यात येणाऱ्या निसर्गाचे बारकावे ही फार महत्त्वाची बाब आहे. आज आधुनिक दळणवळणाची साधने उपलब्ध असली तरी भूप्रदेश आणि निसर्ग नद्या आणि डोंगर यांचे अवलोकन असण्याची दृष्टी जर नसेल तर त्या दळणवळणाला काही अर्थ नाही किंवा त्या पर्यटनाला काही अर्थ नाही. पण पंधराशे वर्षांपूर्वी कालिदासांनी हा प्रवास केलेला दिसतो. त्यांची विद्वत्ता तेवढी होती म्हणूनच त्यांना विक्रमादित्यांच्या दरबारात नवरतकांमध्ये स्थान प्राप्त झाले. मेघदूत चा प्रभाव ज्याप्रमाणे साहित्यिकांवर पडलेला आहे आणि त्यातून त्यांनी त्यातील श्लोकांची वर्णने केलेली आहेत त्याचप्रमाणे या महाकाव्याचा अभ्यास करून त्यात असलेल्या मेघदूतच्या प्रवास मार्गा नुसार पुण्याचे डॉक्टर सुरेश विश्वनाथ भावे यांनी विमानाने आकाश मार्गे या काव्यातील मार्गाचे निरीक्षण करायचे ठरविले. त्यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले. या पद्धतीने आतापर्यंत मेघदुताचा अभ्यास करणारा कोणीही अवतरला नव्हता. डॉक्टर भावे यांच्या रूपाने तो अवतरला.ते वैद्यकीय व्यवसायातील निष्णात असले तरी त्यांनी सर्वात आधी विमान उडविण्याचे प्रशिक्षण पूर्ण केले. त्यांचे स्वत:चे विमान होते. कालिदासांच्या मेघदूत आणि रघुवंश या महाकाव्यांचा आस्वाद घेण्यासाठी त्यांनी संस्कृत चा अभ्यास केला. त्यांनी वर्णन केलेल्या रामटेक पासून हिमालय पर्यंताच्या हवाई मार्गाचे विमानातून प्रत्यक्ष निरीक्षण करून छायाचित्रण केले. मेघदूत मध्ये असलेल्या स्थानांचे हुबेहूब वर्णन आणि छायाचित्रण त्यांनी केलेले आहे. येताना आणि जाताना ढगाळ वातावरण असताना जीव धोक्यात घालून त्यांनी हा प्रवास पूर्ण केलेला आहे. त्यासाठी सरकारकडून काही परवाने घेतलेले होते. एक प्रकारे विरहात असलेल्या यक्षाचा मेघदूत बनूनच डॉक्टर भावे यांनी हवाई मार्गेहे कार्य सिद्ध केलेले आहे. अशाप्रकारे साहित्यिकांपेक्षा वेगळी वाट चोखाळणारे डॉक्टर भावे हे मेघदुताच्या संदर्भात वेगळेच रसायन ठरले आहे. कवी कुलगुरू कालिदास आणि त्यांची संस्कृत नाटके आणि महाकाव्ये पंधराशे वर्षे उलटून गेली तरी अजरामर आहेत. पुढेही राहतील. जोवर मराठी साहित्य आहे, मेघ आहे, रामटेक आहे, आणि रसिक आहेत, लेखक आणि कवी आहेत तोवर दोघांचीही प्रासंगिकता कायम राहणार आहे. अशा प्रकारची रचना इतक्या वर्षात दुसरी उदयाला आलेली नाही. पुढच्या काळात अशा कल्पना कुणाला सुचतील अशी शक्यता दिसत नाही म्हणूनच मेघदूत ही अद्वितीय एकमेव साहित्यकृती ठरते.



## सॅटर्डे संडे ग्रुपच्या १३५ सायकलिस्ट पंढरपूर वारी ऐतिहासिक सायकल रिंगण सोहळ्याने वेधले लक्ष

**नाशिक, दि.१४ - सॅटर्डे संडे ग्रुप, नाशिक यांच्यातर्फे आयोजित पंढरपूर सायकल वारी सलग दुसऱ्या वर्षी अत्यंत यशस्वीपणे संपन्न झाली. विठुमाऊलीच्या जयघोषात, अभूतपूर्व शिस्त आणि उत्साहाच्या वातावरणात झालेल्या या सायकल वारीमध्ये नाशिकमधील डॉक्टर, इंजिनिअर, आर्किटेक्ट, शासकीय अधिकारी आणि नामांकित व्यावसायिक अशा विविध क्षेत्रांतील सायकलिस्ट 'पंढरपूरची वारी लय भारी...' अशा घोषणा देत सहभागी झाले होते.**

या सायकल वारीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात एकाच वेळी तीन पिढ्यांचा संगम पाहायला मिळाला. वारीमध्ये वर्षांखालील पेक्षा जास्त तरुण सायकलिस्ट वारकरी सहभागी झाले होते. तरुणांमधील विठुरायाची ही ओढ सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली. यासोबतच सिनिअर सिटीझन्स (ज्येष्ठ नागरिक), अनेक पती-पतकीच्या जोड्या, वडील-मुलगा आणि सासरे-जावई अशा कौटुंबिक नात्यांमधील सायकलिस्टनी एकत्र येत सुंदर सायकलिंगचे सादरीकरण केले. सर्व सायकलिस्टच्या सुरक्षिततेची काळजी घेत प्रत्येकाचा विशेष इन्शुरन्स (विमा) देखील काढण्यात आला होता.

संपूर्ण प्रवासात महत्त्वाची जबाबदारी गोपाळ कुलकर्णी, अरुणा राणे, सीमा कुलकर्णी, उत्तम दादा निमसे, राजेंद्र देसले आणि विजेंद्र पाटील यांनी कौशल्याने हाताळली. किशोर माने यांनी सर्वांना मोटिव्हेट केले. वारीच्या सांगता प्रसंगी संध्याकाळी भव्य ट्रॉफी डिस्ट्रीब्यूशन कार्यक्रम पार पडला. बाबूदादा ताजनपुर, विकी महाले यांच्यातर्फे सर्व सायकलिस्टना बँड व महिला सायकलिस्टना विशेष भेटवस्तू देण्यात आल्या. ही वारी यशस्वी करण्यासाठी किशोर माने, तृप्तीदा काटकर, बाबूदादा ताजनपुरे, मामासाहेव दत्तू, सूर्यकांत आहेर, किशोर माने, बाबू ताजनपुरे, दत्तात्रय टिळे, आणि संपूर्ण मॅनेजमेंट टीमने विशेष परिश्रम घेतले.

**रथाची आरती व प्रस्थान**

नाशिक येथे या ग्रुपतर्फे तयार करण्यात आलेल्या फूट उंच देखण्या विठुरायाच्या रथाची भव्य आरती करण्यात आली. यानंतर किशोर माने, दादा अडवाणी आणि मविप्र सरचिटणीस नितीन ठाकरे यांनी हिरवा झेंडा दाखवून वारीला प्रारंभ झाला. सर्व सायकलिस्टचे औक्षण करून आणि हार घालून स्वागत करण्यात आले. गगनभेदी गजरात सायकल्स पंढरपूरच्या दिशेने निघाल्या.

**सायकल रिंगण सोहळा**

पंढरपूरला पोहोचल्यानंतर सॅटर्डे संडे ग्रुपच्या सायकलिस्टनी एका रेषेत येत शिस्तबद्ध सायकलिंगचे प्रदर्शन केले. विशेष म्हणजे, तिथे गेल्यानंतर तब्बल सायकलिंग क्लब्ससोबत सॅटर्डे संडे ग्रुपने अधिकृत नाव नोंदवले. पंढरपूर येथे झालेला अभूतपूर्व रिंगण सोहळा हा केवळ सायकल्सचा झाला, जो या वारीचा सुवर्णक्षण ठरला. दुपारी कैकडी मठात सर्व सायकल्स नेण्यात आल्या व पंढरपुरात पोहोचल्यावर प्रत्येक सायकलिस्टचा सत्कार ढोल-ताशांच्या गजरात हार घालून करण्यात आला.

## पथराई येथे थॅलेसेमिया जनजागृती मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव

**नंदुरबार (प्रतिनिधी) - डी. पी. गावित आयुर्वेद कॉलेज अँड हॉस्पिटल, पथराई व जनकल्याण रक्त संकलन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक थॅलेसेमिया दिनानिमित्त आयोजित निबंध व पोस्टर स्पर्धे तील विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ के. डी. गावित शैक्षणिक संकुल, पथराई येथे उत्साहात पार पडला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन राजेंद्रकुमार गावित होते, तर प्रमुख अतिथी म्हणून जनकल्याण रक्त संकलन केंद्राचे अध्यक्ष डॉ. राजकुमार पाटील, डीपी आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. विभूती गावित, थॅलेसेमियाचे पालक योगेश पारेख उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात देव मोगरा मातेच्या पूजनाने करण्यात आली.

यावेळी बोलताना डॉ. राजकुमार पाटील यांनी थॅलेसेमिया या गंभीर आजाराबाबत समाजामध्ये व्यापक जनजागृती होणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच सामाजिक उपक्रमांमध्ये सातत्याने सहभाग घेतल्याबद्दल त्यांनी संस्थेचे कौतुक करत भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात राजेंद्रकुमार गावित यांनी संस्थेतील प्रत्येक विद्यार्थी विविध गुणांनी सक्षम होऊन समाजात प्रवेश करत असून समाजाभिमुख शिक्षण देणे हाच संस्थेचा प्रमुख उद्देश असल्याचे स्पष्ट केले.

यानंतर विजयी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. थलेसेमिया एक सामाजिक आव्हान या मराठी निबंध स्पर्धेत जीएनएमच्या विद्यार्थिनी प्रिया भालचंद्र वळवी हिने प्रथम क्रमांक पटकावत १५०० रोख पारितोषिक, ट्रॉफी व प्रमाणपत्र मिळविले. अमृता सुनील रघुवंशी हिला द्वितीय, तर भक्ती भगवान पाटील हिला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले.

इंग्रजी निबंध स्पर्धेत डी. पी. गावित आयुर्वेद कॉलेज, पथराई येथील सई ऋषिकेश भिंगारे हिने प्रथम क्रमांक, तर दीक्षा नितीन वळवी हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. पोस्टर स्पर्धेत नम्रता सुनील रघुवंशी हिने प्रथम, वैशाली रवी गावित हिने द्वितीय, तर मुनिबा जहिर अन्सारी हिने तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी बीएससी नर्सिंग, फिजिओथेरपी व जीएनएम विभागाचे शिक्षक, विद्यार्थी तसेच विविध शाळांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रणजीत राजपूत यांनी केले, तर पावबा ठाकरे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानून थॅलेसेमियाबाबत जनजागृतीचे उपक्रम वर्षभर सातत्याने राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

पान १ वरुन

### शहरातील बाजारपेठेत वीजेचा खेळखंडोबा

सुरूवात होण्यापुर्वी म्हणजे सात जून पुर्वी वीज पुरवठ्यात येणाऱ्या अडचणी सोडवाव्यात, असे नियोजन केले जाते. जेणे करून पुढील टप्प्यात वीज कंपनीला अखेड वीज पुरवठा करता यावा. त्यातून वीज कंपनीला आर्थिक उत्पन्न मिळावे आणि नागरिकांना मनस्ताप होऊ नये, अशी अपेक्षा असते. पण, वीज कंपनीने याबाबत काहीही उपाययोजना केलेली नाही, असे दिसून आले. कारण, वितरण कंपनीने काहीही उपाययोजना केली नाही. सहाजिकच मंगळवारी कोणत्याही स्वरूपाचा वादळी वारा नाही, पाऊस नाही. तरीही दिवसभर वीजेचा लपंडाव सुरू राहिला. वीज पुरवठा वारंवार खंडीत होत राहिल्याने शहराची मुख्य बाजारपेठ असलेल्या आग्रारोड आणि परिसरातील नागरिकांना आणि व्यवसायिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. अनेक व्यवसायिकांनी पर्यायी व्यवस्था म्हणून इन्व्हर्टर लावले आहे. पण, इन्व्हर्टर सुरू राहण्यासाठी बॅटरी चार्ज होणे आवश्यक असून त्यासाठी सलग काही तास वीज पुरवठा सुरळीत राहणे आवश्यक असते. पण, वीज पुरवठा सतत खंडीत झाल्याने पर्यायी व्यवस्थेतूनही नागरिकांना वीज उपलब्ध झाली नाही. त्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला आणि आर्थिक नुकसान होण्यास वीज वितरण कंपनी जबाबदार आहे, असे अनेक व्यवसायिकांनी सांगितले. वीज कंपनीने ढिसाळ कारभार करायचा आणि आर्थिक नुकसान आम्ही का सहन करायचे, असे प्रश्न नागरिक आणि व्यवसायिकांचा आहे. काही व्यवसायिकांनी नाराजी व्यक्त करीत वीज कंपनीच्या लालबाग परिसरात असलेल्या कार्यालयात संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण, तेथे सक्षम अधिकारी उपस्थित नव्हते तर कार्यालयास टाळे लावून कर्मचारी बेपत्ता झाले होते. त्यामुळे तक्रार घेऊन जाणाऱ्यांना मनस्ताप सहन करण्याची वेळ आहे. अंधारात सामावलेल्या बाजारपेठेत अनेकांनी आपल्या कुवतीनुसार व्यवसाय करण्याचा प्रयत्न केला.

### मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या सामूहिक

केले. ते म्हणाले, या संपूर्ण प्रकरणाला राज्य सरकार, सामाजिक न्याय मंत्री, समाजकल्याण सचिव, राज्य आयुक्त आणि विभागीय आयुक्त थेट जबाबदार आहेत. या सर्व जबाबदार यंत्रणेवर विद्यार्थ्यांच्या हत्येचा प्रयतक केल्याप्रकरणी मनुष्यवधाच्या अंतर्गत तात्काळ गुन्हे दाखल झाले पाहिजेत. दीपकभाई केदार यांनी वसतिगृहाच्या दुरवस्थेचा पाढा वाचताना प्रशासकीय निष्काळजीपणावर तीव्र ताशेरे ओढले.वसतिगृहाची अवस्था अत्यंत दयनीय असून ते विद्यार्थ्यांचे वसतिगृह नसून जनावरांचा गोठा किंवा एखादे जेल असल्यासारखी त्याची अवस्था झाली आहे. गेल्या चार महिन्यांपासून या गरीब मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे हक्काचे मानधन देखील प्रशासनाने अडवून ठेवले आहे, ते पैसे कुठे गेले? असा सवाल त्यांनी उपस्थित केला .विषबाधेमुळे विद्यार्थ्यांच्या तोंडाला फेस येत असतानाही तिथे उपस्थित कर्मचाऱ्यांनी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यासाठी साधे प्रयतक्ही केले नाहीत. वेळेवर रुग्णवाहिका (म्ब्युलन्स) देखील बोलावण्यात आली नाही. यापूर्वी नंदुरबारमध्ये मुलींच्या हॉस्टेलमध्ये पाण्यात विष टाकण्याचा प्रयतक झाल्याचे समोर आले होते. जर प्रशासनाने त्याच वेळी योग्य दखल घेतली असती, तर आज शहाद्यात ही भयानक घटना घडली नसती. वसतिगृहाच्या अन्नाचा दर्जा खालावण्यामागे कंत्राटदारांची साखळी आणि भ्रष्टाचार कारणीभूत असल्याचा आरोप केदार यांनी केला. मूळ कंत्राटदार हा स्वतः काम न करता पुढे सब-कॉन्ट्रॅक्ट देतो. या प्रक्रियेत अगदी वरच्या अधिकाऱ्यांपासून ते खालच्या कर्मचाऱ्यांपर्यंत दलितांच्या हक्काचा पैसा खाल्ला जातो आणि विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जाते. दीपकभाई केदार यांनी शेवटी इशारा दिला की, जर पुढील दोन दिवसांत या प्रकरणी मुख्य दोषींवर आणि कंत्राटदारावर कडक कायदेशीर कारवाई झाली नाही, तर पँथर सेनेच्या वतीने नंदुरबार येथे तीव्र स्वरूपाचा मोर्चा काढून प्रशासनाला लोकशाही मार्गाने सडेतोड उत्तर दिले जाईल.

### परताव्याचे आमीष ठेकेदाराची फसवणूक

सांगितले. त्यात पैसे गुंतवल्यास मोठा आर्थिक लाभ होईल, असे आमिष दाखवले. गुंतवणुकीबाबत अधिकची माहिती देऊन आरोपींनी राहुल मोरे यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर सांगितलेल्या बँक खात्यांवर राहुल मोरे यांनी वेळोवेळी एनईएफटी, आयएमपीएसद्वारे एकूण लाख हजार रुपये वर्ग केले. बऱ्याच दिवसानंतरही कोणताही परतावा अथवा मूळ रक्कम न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे राहुल मोरे यांच्या लक्षात आले. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्या व्हॉट्सप क्रमांक , टेलिग्राम आयडी एएनयु आणि अंजली शर्मा नावाच्या बँक खातेधारकाविरुद्ध (पूर्ण पत्ता माहीत नाही) गुन्हा दाखल झाला आहे. हवालदार मराठे तपास करीत आहेत.

### शब्दकोडे क्रमांक : २४११




**आडवे शब्द :** १.आकाशात उडणारे मोठे प्रवासी वाहन ३.एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी केलेली सफर ६.गुन्हेगारी स्वरूपाची घटना ९.व्याधी ११.सोबत काम करणारा मित्र किंवा मदतनीस १३.मानवी पुरुष १४.नववी तिथी १६. एका प्रकारची डाळ किंवा कडधान्य १७. शस्त्राने केलेली जखम किंवा प्रहार १८.चवीला कडू असणारे किंवा तीव्र विचार २०.एका हिंस्र वन्य प्राण्याचे नाव २२.पराभव करणे किंवा विजय मिळवणे २४.स्वतःस उद्देशून वापरला जाणारा एकवचनी शब्द २५.बागेत उडणारा सुंदर रंगीबेरंगी कीटक २७. गाल २९.स्वयंपाकासाठी किंवा दिव्यासाठी वापरले जाते ३०. तळभाग किंवा पृष्ठभाग ३१.एक चवदार मासा ३३.दिव्याची ज्योत पेटवणारी सुती दोरी ३५.पहा ३७. संध्याकाळची वेळ ३८.अभिनेता ४०.लग्नाची मिरवणूक ४२.रावणाची सोन्याची प्रसिद्ध नगरी ४३.कापडाचा बारीक दोरा ४४.सौंदर्याची देवता ४६.आईची आई-हिंदीत ४७.चुंबन ४९.रुबाब, नखरा किंवा ऐट ५०.तापमापकात वापरला जाणारा द्रव धातू ५१.पाण्याने भिजलेला ५२.दोन गोष्टींमधील अंतर ५४.वजनाने खूप भारी किंवा मोठे सामान ५५.एखाद्या गोष्टीची केलेली अपेक्षा ५६.मृत्यू **उभे शब्द :** १.समोरचा शत्रू किंवा विरोधी पक्षाचा माणूस २.पाऊलखूण किंवा शोध ४.वावर ५.सोबत ६.पंढरपूरची यात्रा ७.दैत्य ८.'तर' या शब्दाचा जोडीदार १०.दर १२.समय १४.जुने-विरुद्ध १५.प्रियकर १७.कुटील डाव १९.भित्रा-हिंदीत २१.पत्त्यांचा एक डाव २२.वस्तू २३.एक फळ २५.एक प्रसिद्ध मराठी-हिंदी सिने नृत्य दिगदर्शिका '*** खामकर' २६.युद्धाचे डावपेच २८.लोभ ३१.मुंबई महाराष्ट्राची काय?आहे ३२.इंग्रजीत-सूर्य ३४.तुज ३६.बट्टा ३९.भित्रा ४१.हिंदीत-मत ४५.श्रीहरी ४६.उदास ४७.लेप ४८.पोटाचा वाढता आकार ५०.'वडा **'एक जगप्रसिद्ध खाद्य ५२.कंगवा ५३.कमी-हिंदीत

**शब्दकोडे क्रमांक : २४१० चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बु | ध | ■ | को | क | ण | ■ | बा | रा | ■ | मो | र |
| ल | ■ | फ | की | र | ■ | ब | र | क | त | ■ | डा |
| ढा | का | ■ | ळा | ■ | दै | ■ | का | ट | क | स | र |
| णा | ■ | सा | ■ | ग | व | ग | वा | ■ | रा | डा | ■ |
| ■ | अ | व | ज | ड | ■ | र | ■ | ची | र | ■ | ना |
| च | क | ली | ■ | ब | डा | ■ | दा | ता | ■ | अं | ग |
| व | ल | ■ | व | ड | ■ | न | ख | ■ | बी | ■ | पू |
| दा | ■ | मा | सा | ■ | वि | ■ | ला | थ | ■ | नी | र |
| र | गा | त | ■ | आ | चा | र | ■ | ल | ग | ट | ■ |
| ■ | ल | ■ | को | ■ | र | म | ल | ■ | त | ■ | पो |
| सा | ■ | चा | क | र | ■ | मा | व | शी | ■ | न | ट |
| ल | प | ■ | म | ■ | र | ण | ■ | त | स | दी | ■ |

प्रकाश में आज पहेलीबार




मिथुन, मौसमी चॅटर्जी, राज बब्बर, सोनम, रंजीत, शक्ती कपूर, अनुपम खेर

## साक्री जवळील देवनगर गावाला महामार्गावर 'अंडरपास'ची मागणी

साक्री, दि.१४ (प्रतिनिधी)- साक्री जवळील देवनगर गावाजवळील राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वर विद्यार्थ्यांच्या व गावकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी इंडियन ऑईल पेट्रोल पंपासमोर अंडरपास (बोगदा) अथवा सुरक्षित क्रॉसिंगची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी महाविद्यालयाच्या व पंढरपूर देवनगर गावातील ग्रामस्थांच्या वतीने माननीय आमदार मंजुळा गावित यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.



महाविद्यालय नॅशनल हायवे क्र. ६ च्या पलीकडे, देवनगर गावाच्या उत्तरेस पंढरपूर शिवार (ता. साक्री, जि. धुळे) येथे स्थित असून, येथे शिक्षण घेणारे बहुतांश विद्यार्थी साक्री, धुळे व नंदुरबार परिसरातून ये-जा करतात. महाविद्यालयात सध्या २८८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना व पंढरपूर येथील ग्रामस्थांना येण्यासाठी व परत जाण्यासाठी नॅशनल हायवे ओलांडावा लागत असल्याने त्यांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महामार्गावर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असून वाहने भरधाव वेगाने धावत असतात. त्यामुळे गावकरी,विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकांना अपघाताचा सतत धोका निर्माण होतो. सकाळ, दुपार व संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत रस्ता ओलांडणे अधिकच कठीण व धोकादायक बनते.

सध्या हॉटेल कृष्णा गार्डनजवळ क्रॉसिंगसाठी सबवेची व्यवस्था प्रस्तावित असली तरी महाविद्यालयाकडे/ पंढरपूर गावाकडे येण्यासाठी प्रास्तावित सब वे चा वापर करावा लागणार आहे. ही व्यवस्था विद्यार्थ्यांच्या/ ग्रामस्थांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पुरेशी सोयीस्कर व सुरक्षित नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यामुळे देवनगर गावाजवळील इंडियन ऑईल पेट्रोल पंपासमोर स्वतंत्र अंडरपास अथवा सुरक्षित क्रॉसिंगची तातडीने उभारणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. आमदार सौ. मंजुळाताई गावित यांनी निवेदन स्वीकारून संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती महाविद्यालय प्रशासनाने दिली. निवेदन देण्याकरता अंबापुर ग्रामपंचायत सरपंच सुरेश बोरकर, भाडणे ग्रामपंचायत सरपंच अजय सोनवणे, शिवसेना शाखाप्रमुख सुरेश कारंडे, आरपीआय तालुका अध्यक्ष कमलाकर मोहिते, आरपीआय प्रदेशाध्यक्ष हेमंत वाघ, शिवसेना उपशहर प्रमुख बाळा शिंदे महाविद्यालयाचे संस्थापक इंजिनीयर प्रवीण सोनवणे व देव नगर पंढरपूर ग्रामस्थ आदी उपस्थित होते.



## पान १ वरुन

### एसटी महामंडळाच्या जागा ९८ वर्षांसाठी

नगरपरिषदा, ७८ ब वर्ग नगरपरिषदा, १४६ क वर्ग नगरपरिषदा आणि ७४३ नगरपंचायती कार्यरत आहेत. या सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या धोरणाचा लाभ होणार असून त्यांच्या आर्थिक क्षमतेत वाढ होऊन नागरी विकासाला अधिक गती मिळण्यास मदत होणार आहे. हे धोरण ३१ जुलै २०३१ पर्यंत किंवा नवीन धोरण येईपर्यंत लागू राहील.

**दीर्घ मुदत; मालकी मात्र एस.टी.ची**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस.टी.) ताब्यातील अतिरिक्त जागांच्या विकास करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक, खासगी भागीदारी धोरणातून सवलत देण्यास मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे एस.टी.च्या जमिन भाडेपट्ट्याने देता येतील. त्यावरील विकास प्रकल्पाना गती मिळेल. एस.टी. महामंडळाची एकही जागा विकली जाणार नाही. दीर्घ मुदतीच्या विकासाची आपण योजना तयार केली आहे. त्यानुसार जागांची लीज होणार आहे. पण मालकी सदैव एस.टी. महामंडळाचीच असणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**राज्यात ३५ हजार एकर जागा**

महामंडळाच्या राज्यात सुमारे ८५० ठिकाणी ३५ हजार एकर जागा आहे. यातील बऱ्याचशा जागा मध्यवर्ती ठिकाणी आहेत. त्या सार्वजनिक खाजगी सहभागा अंतर्गत विकसित करून महामंडळास नियमित उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. त्यातील काही जागांचा वापर बस स्थानक सुविधांसह अनुषंगिक वाणिज्य स्वरूपाचा तर काही जागा पूर्णत: रहिवाशी स्वरूपाच्या आहेत. अशा जागा विकसित करीत असताना बहुतांश वाणिज्य जागांवर व्यापारी संकुलासोबत रहिवाशी, अन्य उपयोगाची मान्यता मिळाल्यास पूर्णत: व्यावसायिक वापर करून महामंडळास फायदा मिळणे शक्य आहे.

**२१३ ठिकाणांचा प्रस्ताव सादर**

राज्य शासनाने एक सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयान्वये महामंडळाच्या जागा व्यापारी तत्त्वावर विकसीत करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयानुसार आणि आठ एप्रिल च्या शासन निर्णयान्वये उत्पन्नवाढीसाठी जागा विविध व्यावसायिक प्रयोजनासाठी अधिक वर्षांच्या म्हणजेच वर्षासाठी भाडे तत्वावर विकसित करण्यास मान्यता दिली आहे. महामंडळाच्या जागा सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर विकसित करताना निवासी, अनिवासी, व्यापारी, औद्योगिक इत्यादी सर्व बाबींसाठी वापरण्यास मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्यावतीने राज्यातील एकूण ठिकाणांच्या विकासाबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. या सर्व जागांच्या विकासासाठी मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समिती, शक्ती प्रदत्त समितीची मान्यता घेण्यातून सवलत देण्यात आली आहे. मात्र प्रकल्पास शासन स्तरावरून अंतिम मान्यता घेणे बंधनकारक असणार आहे.

**प्रत्येक गोष्टीला विरोध योग्य नाही**

या प्रस्तावाला काही संघटनांनी विरोध केला आहे. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, माहिती न घेता प्रत्येक गोष्टीला विरोध करणे योग्य नाही. एसटीतील सर्व घोटाळयांना दूर करून एसटी फायदयात आणणे ही देखील या संघटनांची जबाबदारी आहे. पण यापैकी ते कोणतेही काम करताना दिसत नाहीत असेही मुख्यमंत्री म्हणाले.

### वाढवण बंदराजवळ आंतरराष्ट्रीय दर्जाचा

गुणवत्ता परीक्षण सुविधा, कंटेनर टर्मिनल, रेल्वे सायडिंग, ई-लिलाव व्यवस्था आणि निर्यात सुलभता केंद्र उभारण्याचे नियोजन आहे.

**महाराष्ट्राच्या निर्यात क्षमतेला बळ**

महाराष्ट्र द्राक्ष, डाळिंब, कापूस आणि कडधान्य उत्पादनात देशात प्रथम क्रमांकावर असून फळे व भाजीपाला उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर आहे. देशाच्या एकूण कृषी निर्यातीपैकी सुमारे १५ टक्के निर्यात महाराष्ट्रातून होत असून, भारतातील ४३ टक्के फळ निर्यातही राज्यातून केली जाते. दापचरी प्रकल्पामुळे या निर्यात क्षमतेत आणखी वाढ होण्याची अपेक्षा पणन मंत्र्यांनी व्यक्त केली.

**निर्यात व रोजगार वाढीस चालना**

या प्रकल्पामुळे काढणीनंतर होणाऱ्या नुकसानीत १५ ते २० टक्क्यांनी घट होण्यास मदत होणार असून, शेतमाल वाहतूक व हाताळणी खर्चातही १५ ते २० टक्क्यांची बचत अपेक्षित आहे. प्रकल्पामुळे १० हजारांहून अधिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसह कृषी प्रक्रिया उद्योग आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी गती मिळणार असल्याचे मंत्री रावल यांनी सांगितले.

**जागतिक बाजारपेठेशी थेट जोडणी**

वाढवण डीपवॉटर पोर्ट, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जवाहरलाल नेहरू बंदर, समृद्धी महामार्ग, वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर आणि वडोदरा एक्सप्रेस वे यांसारख्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांशी जोडणीमुळे निर्यात सुलभ होऊन लॉजिस्टिक खर्चात बचत होणार आहे. फळे, भाजीपाला, फुले, धान्य, कडधान्ये, मसाले आणि प्रक्रिया केलेल्या कृषी उत्पादनांच्या निर्यातीला या प्रकल्पातून मोठी चालना मिळेल. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या पुढाकाराने आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली विकसित होणारा हा प्रकल्प महाराष्ट्राला देशातील अग्रगण्य कृषी निर्यात केंद्र बनविण्याच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा ठरेल, असे सांगून दापचरी येथील आंतरराष्ट्रीय कृषी बाजार हा केवळ बाजार नसून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेशी जोडणारा विकासाचा नवा मार्ग असल्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी यावेळी नमूद केले.

### सुनेत्रा पवार यांचे अध्यक्षपद धोक्यात?

यासंदर्भात कायदेशीर सल्ला घेऊ. माहिती घेऊ आणि नंतरच कारवाई करु, असे सुनील तटकरे यांनी सांगितले.

**सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्त्वात राष्ट्रवादी पक्ष**

या नोटिशीची कायदेशीर वैधता तपासावी लागले. परंतु मला वैयक्तिकरित्या या नोटिशीत काही तथ्य आहे, असे वाटत नाही. आम्ही एकत्रित बसून राष्ट्रीय अध्यक्षांची निवड केलेली आहे. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्त्वात राष्ट्रवादी पक्ष एकसंघ आहे. आमच्या पक्षात लोकशाहीने काम चालते, असा ठाम विश्वासही तटकरे यांनी व्यक्त केला.

**राष्ट्रवादीला अर्थमंत्रिपद कधी मिळणार?**

सुनील तटकरे यांनी राज्याच्या अर्थमंत्रिपदावरही भाष्य केले. अर्थमंत्रिपद हे सध्या राष्ट्रवादीच्या वाट्याला आलेले आहे. परंतु या पदाची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच आहे. त्यामुळे हे खाते आम्हाला मिळावे, अशी राष्ट्रवादीची मागणी आहे. यावर बोलताना लवकच आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहोत. लवकरच आम्ही हा प्रश्न मार्गी लावू, असे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे भविष्यात काय होणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### सोनम वांगचुक यांचे आठ किलो वजन घटल

बोलण्याचे आवाहन केले. मला फुन्सुक वांगडूने मरावे असे वाटत नाही, असे ओमी वैद्य आपल्या व्हीडीओमध्ये म्हटले आहेत. हॅलो इडियट्स, ओळखलंत का? मी ओमी वैद्य, म्हणजेच थ्री-इडियट्समधील चतुर आणि द ऑफिसमधील सादिक. माझ्याकडे तुमच्यासाठी एक अतिशय महत्त्वाचा संदेश आहे. मी सहसा असे व्हीडीओ बनवत नाही, चित्रपटातील आमीर खानने साकारलेली फुन्सुक वांगडू ही लोकप्रिय व्यक्तिरेखा खऱ्या आयुष्यात सोनम वांगचुक यांच्यावरच आधारित आहे, याची आठवण ओमीने करून दिली. ते म्हणाले, थ्री इडियट्समधील फुन्सुक वांगडू हे पात्र लडाखचे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्यावरून प्रेरित आहे. मी त्यांना भेटलो आहे, ते अतिशय साधे आणि अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे आहेत. वांगचुक यांच्या खालावत चाललेल्या प्रकृतीवर चिंता व्यक्त करताना ओमी म्हणाले, ते सध्या दीर्घकालीन उपोषणावर आहेत. त्यांची रक्तातील साखरेची पातळी अत्यंत कमी झाली आहे. प्रसारमाध्यमे या विषयाला कितपत प्रसिद्धी देत आहेत मला माहीत नाही. पण, ही अतिशय गंभीर बाब आहे. ते लडाखची स्वायत्तता, शिक्षण आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी लढा देत आहेत. तुमचे त्यांच्याशी मतभेद असू शकतात. पण, या माणसाचा जीव जाणे योग्य नाही. प्रत्येकाने काही वेळ काढून या विषयाचे गांभीर्य समजून घेतले पाहिजे, असा महत्त्वपूर्ण संदेश त्यांनी व्हीडीओच्या माध्यमातून दिला आहे.

## पान १ वरुन

### ह.बाबा पीर सरकार उर्स निमित्त

युवक सहभागी व्हावेत, असा संदेश यावेळी देण्यात आला. रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सय्यद मुजफ्फर अली, जाकीर अली (जे. के. दादा) यांच्यासह गुड्डू शाह, सुफियान मलिक, सोबान शेख, मुदस्सिर शेख, जुबेर शेख, फराज शेख, अदनान शेख, समीर शाह आणि समीर पटवे व युवा कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिराचे नियोजन, नोंदणी, रक्तदात्यांची व्यवस्था, वैद्यकीय पथकाला सहकार्य तसेच इतर सर्व नियोजनबद्ध कामकाज अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने पार पडले. त्यामुळे उपस्थितांनी आयोजकांचे मनापासून कौतुक केले. हजरत बाबा पीर सरकार यांच्या उर्साच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेले हे रक्तदान शिबिर केवळ धार्मिक उत्सवापुरते मर्यादित न राहता मानवता, बंधुभाव, सामाजिक ऐक्य आणि समाजसेवा यांचा प्रेरणादायी संदेश देणारे ठरले. शहरातील नागरिकांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत करत अशा लोकहिताच्या उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. रक्ताचा एक थेंब एखाद्याला नवजीवन देऊ शकतो. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, समाजातील प्रत्येक निरोगी व्यक्तीने नियमित रक्तदान करून गरजूंच्या मदतीसाठी पुढे यावे, असा प्रेरणादायी संदेश यावेळी आयोजकांनी दिला.

### नवापूरला विकासाचा शब्द पाळला

पाटील, नगरसेवक धर्मेश पाटील, शिरीष प्रजापत, सी ए वतन अग्रवाल,सोमित्र गावीत,मनोहर गावीत,नाविद शहा, अल्तमस खाटीक, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहर अध्यक्ष मनोहर नगराळे, अमृत लोहार, अविनाश वसावे, इरफान कुरेशी, राजू आगळे, नवापूर नगरपालिकेचे सर्व नगरसेवक, पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील, गटविकास अधिकारी देविदास देवरे, मुख्याधिकारी डॉ. मयुर पाटील, गटशिक्षण अधिकारी रमेश देसले विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जुनी पोलीस लाईन ते पंचायत समिती हा मार्ग शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या रस्त्यांपैकी एक असून, खराब अवस्थेमुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. पावसाळ्यात या मार्गावरील समस्या अधिक गंभीर होत असल्याने नागरिकांकडून कॉंक्रीटीकरणाची मागणी सातत्याने होत होती. अखेर या रस्त्याला निधी मंजूर झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ज्येष्ठ नेते भरतभाऊ गावित म्हणाले, नवापूर शहराच्या विकासासाठी दिलेला प्रत्येक शब्द पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. नागरिकांना दर्जेदार रस्ते, शुद्ध पाणी, स्वच्छता आणि आधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे हेच आमचे ध्येय आहे. शहराचा सर्वांगीण विकास हा आमचा संकल्प असून, विकासकामांचा वेग यापुढेही कायम राहील. तद नंतर नगराध्यक्ष जयवंत जाधव ,उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे यांनी पण आपले मनोगत व्यक्त केले.

### महापालिकेची महत्वाकांक्षी कारवाई

धुळे शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या पाचकंदील मार्केटच्या पुनर्विकासाचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला असल्याचा दावा करण्यात येत आहे. महापालिका प्रशासनाचा हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, या प्रकल्पासाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. नवीन आणि आधुनिक स्वरूपात हे मार्केट उभारण्यासाठी येथील चारही जुने मार्केट पाडणे आवश्यक होते. यापुर्वी लालबहादूर शास्त्री भाजी मार्केट आणि फळ मार्केट पाडण्यात आले होते. परंतु, शंकर मार्केट, शिवाजी मार्केट आणि दाणा बाजार येथील जुन्या दुकानांचे बांधकाम पाडण्यात आले नव्हते. गाळेधारकांचा कायदेशीर विरोध आणि वादामुळे अनेक वर्षांपासून हा प्रकल्प रखडला होता. मात्र, सोमवारी अखेर मनपाने यावर कारवाई केली. सोमवारी सकाळी नऊला व्यापाऱ्यांना त्यांचे माल आणि साहित्य काढून घेण्यासाठी महापालिकेकडून वेळ देण्यात आला होता. महापालिका ही कारवाई करणारच याची खात्री पटल्यामुळे व्यापाऱ्यांची मोठी धावपळ उडाली. व्यापाऱ्यांनी कोणतीही हुज्जत न घालता स्वतःहून दुकानांमधील मौल्यवान कापड, फर्निचर व इतर सामान बाहेर काढण्यास सुरुवात केली. सोमवार दुपारी तीननंतर प्रत्यक्ष पाड कामाला सुरुवात झाली, जी रात्री उशिरापर्यंत सुरूच होती.

कारवाई दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. धुळे शहर पोलीस ठाणे आणि आझादनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी, सुमारे चाळीस पोलीस कर्मचारी, आरसीपीचे पथक आणि महावितरणचे कर्मचारी असा मोठा लवाजमा पाचकंदील चौकात तैनात होता. अखेर कोणतीही बाधा न येता महापालिकेने ही ऐतिहासिक कारवाई पूर्ण केली असून आता या परिसराचा कायापालट होणार असल्याचे सांगण्यात आले.अनेक वर्षांपासून रखडलेला हा प्रश्न महापालिकेने धडक पावले उचलत मार्गी लावला आहे. आता या मध्यवर्ती भागात धुळेकरांना लवकरच एक आधुनिक आणि सुसज्ज असे नवीन मार्केट पाहायला मिळणार आहे, असा दावा करण्यात येत आहे. महापालिकेकडून कारवाई होत असताना काही व्यवसायिकांनी दुकान उभारताना वापरलेले लोखंडी साहित्य मिळविण्यासाठी धडपड केली.

### हस्ती ग्रुपचे कांतीलाल जैन, शांतीलाल जैन यांना

पिढीला मोलाचा सल्ला दिला. मराठी तरुणांमध्ये प्रचंड क्षमता असून त्यांनी आत्मविश्वासाने उद्योजकतेकडे वळावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सोहळ्यात उद्योग क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल महत्त्वाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार हस्ती ग्रुप दोंडाईचा येथील कांतीलाल जैन आणि शांतीलालजी जैन यांना मरणोत्तर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महिला उद्योजिका पुरस्कार कविता संतोष बिरारी यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. मराठी उद्योजकता पुरस्कार धुळ्याचे यशस्वी उद्योजक अविनाश पाटील यांना देऊन गौरविण्यात आले. सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट ही महाराष्ट्रीयन व्यवसायिकांच्या प्रगतीसाठी काम करणारी एक महत्त्वाची संस्था आहे. आज संपूर्ण देशभरात या क्लबच्या दीडशे हून अधिक शाखा कार्यरत असून सात हजारांपेक्षा जास्त उद्योजक याचे सभासद आहेत. धुळे शाखेकडून दरवर्षी अशा प्रकारे यशस्वी उद्योजकांचा गौरव करून नवोदितांना प्रेरणा दिली जाते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सॅटर्डे क्लब धुळे विभागाचे प्रमुख दिग्विजय पाटील, चेअरपर्सन राहुल बागुल, कुणाल नाशिककर, सविता देवरे यांच्यासह सर्व पदाधिकारी आणि कोर टीमने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला धुळेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

### अज्ञात वाहनाची धडक अजनाळेजवळ दोन ठार

गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाले. इतर चार नातेवाईक गंभीर जखमी झाले. अपघातानंतर अज्ञात वाहन चालक घटनास्थळावरून फरार झाला. याप्रकरणी योगेश अहिरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार धुळे तालुका पोलिस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरुदध गुन्हा दाखल झाला.

## पान १ वरुन

### अन्न, औषध प्रशासनाकडून धुळयात

माहिती अन्न व औषध प्रशासनाने दिली आहे. याच मोहिम दरम्यान मिठाईच्या एका दुकानाची तपासणी केली असता मुदत बाह्य अन्नपदार्थ विक्रीसाठी साठवून ठेवल्याचे आढळून आले. तसेच आस्थापनात अस्वच्छता, अन्नपदार्थांवर माशांचा प्रादुर्भाव आणि अन्न सुरक्षा व मानके कायदा, २०२६ मधील विविध तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित आस्थापना तात्काळ बंद करण्यात आल्या. तसेच शिवाजी महाराज पुतळ्याजवळ पारोळा रोड येथील एका या आस्थापनेच्या उत्पादन कक्षात आवश्यक परवान्याशिवाय अन्नपदार्थांचे उत्पादन व विक्री सुरू असल्याचे तपासणीत आढळले. याशिवाय अन्न सुरक्षा व मानके कायदा, २०२६ मधील विविध नियमांचे उल्लंघन झाल्याने या आस्थापनेचा उत्पादन कक्षही तात्काळ बंद करण्यात आला. ही कारवाई अन्न व औषध विभागाचे सहाय्यक आयुक्त गो. वी. माहोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी आनंद पवार, शशिकांत राणे तसेच अरविंद राऊत आणि मंगेश भावसार यांनी संयुक्तपणे केली. अन्न व औषध प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या आस्थापनांविरुद्ध अशी तपासणी मोहीम पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तक्रार असल्यास नागरिकांनी विभागाकडे माहिती द्यावी, असे आवाहन केले आहे.

# दोंडाईच्यात एफडीएची कारवाई एक्काहत्तर हजारांचा गुटखा जप्त

धुळे, दि. १४ (प्रतिनिधी) -जिल्ह्यातील दोंडाईचा येथे अन्न व औषध प्रशासनाने प्रतिबंधित गुटखा व पान मसाल्याविरोधात धडक कारवाई करत ७१ हजार ६१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोन संशयितांविरुद्ध दोंडाईचा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तेरा जुलै २०२६ रोजी गुप्त माहितीच्या आधारे गोपाल हॉटेलजवळ दोंडाईचा रेल्वे स्टेशनकडील परिसरात दोन जण प्रतिबंधित केलेला गुटखा, पान मसाला व तंबाखू बाळगत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी जाऊन संशयितांची तपासणी केली.तपासणी दरम्यान त्यांच्या ताब्यातून ८५५ पॅकेट प्रतिबंधित गुटखा, पान मसाला व तंबाखू, असा एकूण ७१ हजार ६१० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. पुढील कारवाईसाठी दोघांना दोंडाईचा पोलीस ठाण्यात आणण्यात आले. या प्रकरणी तुषार मधुकर चौधरी आणि विठोबा शरद ठाकूर, दोघेही रा. दोंडाईचा यांच्याविरुद्ध प्रतिबंधित अन्नपदार्थ बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई सहाय्यक आयुक्त जी. व्ही. माहोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी आनंद पवार, शशिकांत राणे, अरविंद राऊत, मंगेश भावसार यांनी केली.

### शहाद्यात श्री.जगन्नाथ रथयात्रा १६ ला. होणार

शहादा, दि.१४(प्रतिनिधी)- येथील श्रीनारायण भक्ती पंथचे प्रवर्तक संतश्री लोकेशानंद महाराज यांच्या प्रेरणेतून शहादा शहरात गेल्या पाच वर्षांपासून आषाढ शुद्ध बीज या दिवशी श्रीजगन्नाथजी यांच्या रथयात्रेचे भव्य आयोजन करण्यात येते. यावर्षी पण गुरूवार दि.१६ जुलै रोजी सकाळी ९:३० वाजता भव्य रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.



या रथयात्रेत श्रीजगन्नाथजी, सुभद्राजी व बलरामजी यांचे दिव्य स्वरूप दर्शनाचा लाभ घेता येणार आहे.

सदरची रथयात्रेस सप्तशृंगी माता मंदिर येथून प्रारंभ होऊन स्टेट बँक ऑफ इंडिया, बस स्टॅन्ड, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, अहिंसा चौक ते दादावाडी येथे रथयात्रेची सांगता होईल. भगवान श्रीजगन्नाथजी यांच्या सुशोभित रथाला असलेला दोर प्रत्येक भाविकांना आपल्या हातांनी ओढण्याचे सौभाग्य प्राप्त करून घेता येईल. शहरातील व परिसरातील सर्व भाविकांनी श्रीजगन्नाथजी यांच्या भव्य रथयात्रेस उपस्थित राहून दर्शनाचा व नंतर श्रीश्रीनारायणपूरम तीर्थ येथे महाप्रसादाचा लाभघ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.


### शिंदखेड्यात फिजिओथेरपी कॅम्प संपन्न -५५रुग्णांनी लाभ

शिंदखेडा - येथील समता भवन मध्ये मोफत फिजिओथेरपी कॅम्प आयोजित करण्यात आला. एकूण लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. डॉ.पूर्वी ओसवाल आणि डॉ. युक्ती अग्रवाल यांनी या कॅम्प मध्ये आपली सेवा दिली. या उपक्रमाला इनरव्हील क्लब ऑफ शिंदखेडाच्या सदस्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. पुढील समाजोपयोगी उपक्रमांनाही असेच सहकार्य लाभेल, अशी अपेक्षा अध्यक्षा मनीषा नाईक,सचि उदिता गिरासे यांनी व्यक्त केली.

## निधन वार्ता

### उत्तम माळी

नंदुरबार, दि.१४ (प्रतिनिधी)-



शहरातील पेडकाई नगर येथील रहिवासी आणि श्रॉफ हायस्कूलचे निवृत्त कर्मचारी उत्तम चिंधू माळी (वय ८९) यांचे १० जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नंदू माळी आणि अविनाश माळी यांचे ते वडील होते.

### भरत बडगुजर

धुळे, दि.१४- शिंदखेडा



तालुक्यातील वर्षी येथील रहिवासी भरत आत्माराम बडगुजर (वय ६८) यांचे मंगळवारी (दि.१४) रोजी दुपारी ४ वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा उद्या बुधवारी (दि.१५) रोजी सकाळी १०.३० वाजता वर्षी येथील राहत्या घरापासून निघेल. त्यांच्या पश्चात भाऊ, पत्नी, मुलगा, दोन मुली, सून, जावाई,नातवंडे असा परिवार आहे. ते रमेश बडगुजर यांचे लहान बंधू तर उद्योजक शैलेश बडगुजर यांचे वडिल होत.

**WALK IN INTERVIEW**

We are looking highly experienced and skilled personnel for one of our leading Solvent Extraction Plant & Edible Oil Refinery situated at M.I.D.C, Dhule (Maharashtra)

**Accountant/Data Entry Operator - 2 Post each (M)**

(B.com/Tally prime is must and having minimum 2 years' experience)

**Godown Supervisor- Post-2 (M)**

(Graduate with 1 year experience)

**Edible Oil Filling Machine Operator - Post -2 (M)**

(Candidate should have experience in operation and maintenance of fully automatic Pouch filling Machine, Multi head Jar filling Machine (Span Pack) & Multi head Tin filling Machine (Span Pack)

Interested candidates may come for **Walk in Interview** on below address on **18.07.2026 to 20.07.2026 between 3:30 pm to 5.30 pm** along with Bio-data, Testimonials and Passport size photo is essential.

**Please note, candidates who had been interviewed previously for above post need not re-apply.**

**Sanjay Soya Private Limited**

E-131/1, M.I.D.C., Behind S.T. Workshop, Awadhan, Dhule.

**प्लॉट विकणे आहे**

नगाव सर्व्हे क्र.१९१/1 नगावबारी येथील प्लॉट क्र.१७८ २००० चौफुट प्लॉट विकणे आहे.

-: संपर्क :-

7588517134

**पाहिजेत**

१०वी, १२वी पास असलेली हुशार व अनुभवी मुले लावणे आहेत. जागा -५ मुले

-: संपर्क :-

सोमनाथ ओनियन सप्लायर्स

दु.नं.५, कॉटन मार्केट यार्ड, पारोळा रोड, धुळे

9604090099
9420005990

**घर व शेती विकणे**

घर व शेती विकणे आहे. गं.नं. ७ येथील सिटी सर्वे. नं. २२१९ येथील ८X५०= ४०० स्केअर फूट व अंबोडे येथील शेती ३ बिगे विकणे आहे.

- संपर्क -

9595606474
9923113130

**डिटीपी ऑपरेटर पाहिजेत**

इनडिझाईनमधे काम करु शकणारा डिटीपी ऑपरेटर चांगल्या पगारावर नेमणे आहे.

-: संपर्क :-

दै.आपला महाराष्ट्र

9422286496

**पाहिजेत**

दुकान कामासाठी अनुभवी माणूस-१
अनुभवी Tally ऑपरेटर (पार्टटाईम) - १

7588517770
9922415601

**घर भाड्याने देणे**

डी मार्ट जवळील वरच्या मजल्यावरील २ रुम सर्व सोयींनी युक्त शुद्ध शाकाहारी लहान कुटुंबाला भाड्याने देणे आहे.

9422736263

**पाहिजेत**

स्वर्ण पॅलेस ज्वलर्स

सेल्समन - १
सेल्समॅडम - १
हेल्पर - २

आग्रा रोड, धुळे

02562 232428/ 355891

५९ वर्षापासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...

Authorised Dealer

Godrej

LG Life's Good

सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

BAJAJ FINSERV HDB FINANCIAL SERVICES

श्री महावीर इलेक्ट्रीक अ‍ॅण्ड टी.व्ही.

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

**पाहिजे**

होलसेल एजन्सी कामासाठी मॅनेजर पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान तसेच Tally Prime चे बेसिक ज्ञान आवश्यक. आकर्षक पगार.

- संपर्क -

Konnect Corporation

नवग्रही गल्ली नं.२, श्रीराम पेन समोर, धुळे

7020165218
9850096250

**पाहिजेत**

मोहन रेस्टॉरंटसाठी कारागीर, किचन हेल्पर, वेटर, साफसफाई, अनुभवी प्राधान्य. आकर्षक पगार त्वरीत संपर्क साधावा.

मोहन रेस्टोरेंट

कुमार नगर, साक्री रोड, धुळे

- संपर्क -

8888014766
8830594415

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०